शिष्यवृत्ती परीक्षा इयत्ता ८वी

विषय – मराठी (प्रथम भाषा)

घटक 3 – कार्यात्मक व्याकरण

भारांश – 44%   प्रश्नसंख्या – 11   एकूण गुण 22

3.1 वर्णविचार

वर्ण- आपल्या मुखातून विविध ध्वनी उमटत असतात. या मूलध्वनींनाच वर्ण म्हणतात.

मराठी भाषेत एकूण 50 मूळ वर्ण आहेत.

वर्णांचे प्रकार-

1. स्वर- यांचा उच्चार दुसऱ्या वर्णाच्या मदतीशिवाय म्हणजेच स्वतंत्रपणे होतो. एकूण 14 स्वर आहेत. अ आ इ ई उ ऊ ऋ लृ ए ॲ ऐ ओ ऑ औ
2. स्वरादी - यांचा उच्चार करताना वर्णाच्या अगोदर स्वर येतो.

   अं अः

3. व्यंजने - यांचा उच्चार स्वतंत्रपणे करता येत नाही.

क् पासून ळ् पर्यंत ३४ व्यंजने आहेत.

विशेष संयुक्त व्यंजने - क्ष, ज्ञ यांचा समावेश वर्णमालेत होत नाही.

स्वरांचे प्रकार

1. ऱ्हस्व स्वर - यांचा उच्चार करण्यास कमी वेळ लागतो.

   अ इ उ ऋ लृ

   दीर्घ स्वर - यांचा उच्चार लांबट होतो.

   आ ई ऊ ए ऐ ओ औ

२. संयुक्त स्वर - दोन स्वर एकत्र येऊन बनलेले

ए= अ+इ/ई,   ऐ= आ+इ/ई,   ओ= अ+उ/ऊ,   औ= आ+उ/ऊ

३. सजातीय स्वर - एकाच उच्चारस्थानातून निघणारे स्वर - अ-आ | इ- ई | उ-ऊ

4. विजातीय स्वर- भिन्न उच्चारस्थानांतून निघणारे स्वर- अ-उ | उ-ए | अ – इ

व्यंजनांचे प्रकार -

1. स्पर्श व्यंजने - यांचा उच्चार करताना फुफ्फुसांतील हवा तोंडावाटे बाहेर पडताना जीभ, कंठ, तालू, दात, ओठ यांच्याशी तिचा स्पर्श होऊन हे वर्ण उच्चारले जातात. ‘क्’ पासून ‘म्’ पर्यंतची व्यंजने.

२.अनुनासिक/पर-सवर्ण - यांचा उच्चार, उच्चारस्थानांबरोबरच नाकातूनही होतो.

ङ् ञ् ण् न् म्

३.कठोर व्यंजने- उच्चाराची तीव्रता जास्त असतो. क्, ख्....

मृदू व्यंजने- उच्चार सौम्य, कोमल असतो. ग् , घ् , ङ् .....

वर्ग	कठोर व्यंजने	मृदू व्यंजने	अनुनासिके
‘क’ वर्ग	क् ख्	ग् घ्	ङ्
‘च’ वर्ग	च् छ्	ज् झ्	ञ्
‘ट’ वर्ग	ट् ठ्	ड् ढ्	ण्
‘त’ वर्ग	त् थ्	द् ध्	न्
‘प’ वर्ग	प् फ्	ब् भ्	म्
इतर	श् ष् स्	ह् य् र् ल् व् ळ्	-

4. अर्धस्वर - य् र् ल् व् यांची उच्चारस्थाने अनुक्रमे इ ऋ लृ उ या स्वरांच्या उच्चार स्थानासारखीच आहेत. संधी होताना या स्वरांच्या जागी वरील व्यंजने किंवा व्यंजनांच्या जागी हे स्वर येतात.

इ + अ = य् + अ (उदा. अति + अंत = अत्यंत)

अर्धस्वर ही मृदू व्यंजने आहेत.

5. उष्मे /घर्षक – श् ष् स् उच्चारताना मुखावटे जोराने उसाचा बाहेर टाकल्यामुळे या वर्णांचा उच्चार होतो.

६. महाप्राण - 'ह्' चा उच्चार करताना फुफ्फुसांतील हवा तोंडावाटे जोराने बाहेर फेकली जाते, म्हणून त्याला महाप्राण म्हणतात.

उदा. ख् घ् छ् झ् ठ् ढ् थ् ध् फ्, भ्, श्, ष्, स्, ह्

तर उरलेली (२०) अल्पप्राण व्यंजने आहेत.

उच्चारस्थानांनुसार वर्णांचे वर्गीकरण

स्वर	व्यंजने	मुखाचा भाग	वर्णाचे नाव
अ आ	क् ख् ग् घ् ङ् ह्	कंठ	कंठ्य
इ ई	च् छ् ज् झ् ञ् य् श्	तालू	तालव्य
ऋ	ट् ठ् ड् ढ् ण् र् ष् ळ्	मूर्धा	मूर्धन्य
लृ	त् थ् द् ध् न् ल् स्	दंत	दंत्य
उ ऊ	प् फ् ब् भ् म्	ओष्ठ	ओष्ठ्य
ए ऐ	-	कंठ +तालू	कंठतालव्य
ओ औ	-	कंठ + ओष्ठ	कंठौष्ठ्य
-	व्	दंत + ओष्ठ	दंतौष्ठ्य
-	च् छ् ज् झ्	दंत + तालू	दंततालव्य

- (च् छ् ज् झ् यांचा उच्चार 'य'युक्त होतो तेव्हाच ते तालव्य असतात. उदा.च्य, छ्य.)
- दंततालव्य वर्ण - च् छ् ज् झ् यांचा उच्चार 'अ'युक्त होतो तेव्हाच ते दंततालव्य असतात. ('य' न लावता)

सराव प्रश्न

प्र.1 उच्चार स्थानानुसार भिन्न असणारा वर्ण ओळखा.

1) क 2) ड 3) ह 4) ग

उत्तर – पर्याय 2

स्पष्टीकरण – क,ह,व ग हे कंठ्य वर्ण आहेत. तर ड हा मूर्धन्य वर्ण आहे.

प्र.2 पुढील पर्यायातील कोणत्या शब्दांतील वर्णसंख्या समान आहे?

अ) महाराष्ट्र   ब) कर्नाटक   क) तामिळनाडू   ड) कन्याकुमारी

1) अ व क   2) अ व ब   3) क व ड   4) ब व क

उत्तर - पर्याय – 1

स्पष्टीकरण –

महाराष्ट्र = म् + अ + ह् + आ + र् + आ + ष् + ट् + र् + अ = 10

कर्नाटक = क् + अ + र् + न् + आ + ट् + अ + क् +अ = 9

तामिळनाडू = त् + आ + म् + इ + ळ् + अ + न् + आ + ड् + ऊ = 10

कन्याकुमारी = क् + अ + न् + य् + आ + क् + उ + म् + आ + र् + ई = 11

प्र.3 'ज' च्या उच्चारानुसार भिन्न असणारा पर्याय निवडा.

1) जनमत   2) पराजय   3) गजमुख   4) अजगर

उत्तर – पर्याय – 4

स्पष्टीकरण – पर्याय 1, 2, 3 मध्ये 'ज' चा उच्चार 'ज्य' असा होतो; तर पर्याय 4 मध्ये 'ज' असा होतो.

सौ. जयश्री सुनिल पलांडे

सरावासाठी प्रश्न

प्र.1 पुढे दिलेल्या किती शब्दांची सुरुवात 'तालव्य' वर्णाने झाली आहे ? (2020)

चक्कर, जाळी, चक्र, चाळीस, चलन, चंद्र, जरायुज, जलमार्ग, झरोका, झालर, चकवा.

1) आठ 2) सहा 3) तीन 4) सात

प्र.2 पुढीलपैकी मृदू वर्ण कोणता ?(2023)

1) क् 2) ध् 3) ध् 4) फ्

प्र.3 पुढीलपैकी दंत्य वर्ण कोणता? (दोन अचूक वर्ण निवडा. 2024)

1) ळ् 2) ण् 3) स् 4) न्

प्र. 4 पुढील पर्यायातील कोणत्या शब्दातील वर्णसंख्या अकरा आहे? (दोन अचूक पर्याय निवडा 2018)

1) ब्रह्मचर्य 2) ज्ञानवृद्धी 3) अक्षरज्ञान 4) सर्वश्रुत

प्र. 5 पुढीलपैकी कोणती जोडी सजातीय स्वरांची नाही?

1) अ – आ 2) अ – उ 3) इ – ई 4) उ – ऊ

प्र. 6 पुढीलपैकी अर्धस्वर कोणता नाही ? (दोन पर्याय निवडा)

1) प् 2) र् 3) ज् 4)ल्

प्र.7 पुढे दिलेल्या किती शब्दांची सुरुवात दंत्य वर्णाने झाली आहे ?

पतंग, मनुष्य, रवी, मधुकर, लसूण, एडका, तरुण, डमरू, नगारा, दमडी.

1) तीन 2) पाच 3) चार 4) दोन

प्र. 8 खालीलपैकी कोणते घर्षक नाही ?

1) श् 2) ष् 3) स् 4) प

उत्तरे

1. 1
2. 2

3. 3 व 4
4. 1 व 2
5. 2
6. 1 व 3
7. 3
8. 4